एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

मुंबई, बुधवार २९ मे, २०१९ • वर्ष-९७, अंक-८३, पाने-१०, किंमत : ₹ ४

24x7 : www.enavakal.com • संपादक - सौ. जयश्री खाडिलकर-पांडे • Email-navakal.1923@gm

## लीलावती विजयी

### रुपेशची हॅट्ट्रीक, आयडियल क्रिकेट



मुंबई, दि. २८ (क्री.प्र.) - ऑफस्पिनर रुपेश कोंडाळकरची हॅट्ट्रीक व मनोहर पाटेकरचे अर्धशतक यामुळे लीलावती हॉस्पिटल क्रिकेट संघाने ग्लोबल हॉस्पिटलचा ७६ धावांनी पराभव केला आणि माजी नगरपाल डॉ. जगन्नाथराव हेगडे यांच्या वाढदिवसानिमित्तच्या द्वितीय आयडियल आंतर हॉस्पिटल टी-२० क्रिकेट स्पर्धेची दुसरी फेरी गाठली. सलामीवीर योगेश परब, महेश गोविलकर व संतोष साळुंखे यांनी ४ बाद १०४ धावा असा दमदार प्रारंभ ग्लोबल हॉस्पिटल संघाला करून दिला असतांना डावखुरा फिरकी गोलंदाज रुपेश कोंडाळकरच्या हॅट्ट्रीकने सामना लीलावती हॉस्पिटलच्या बाजूने झुकविला. लोकसेवा फौंडेशन व आयडियल स्पोर्ट्स-क्रिकेट क्लबतर्फे माहीम ज्युवेनील स्पोर्ट्स क्लब व फिजर पे स्पोर्ट्स सहकार्याने ही स्पर्धा शिवाजी पार्क मैदानात सुरु आहे.

स्वराज्य फौंडेशनचे अध्यक्ष उदय पवार व अविकर प्रतिष्ठान हॉटेल मॅनेजमेंटचे संचालक विलास डगे यांच्या उपस्थितीत नाणेफेक हरून ग्लोबल हॉस्पिटल विरुद्ध लीलावती हॉस्पिटलने प्रथम फलंदाजी केली. लीलावती हॉस्पिटलच्या सलामीवीर मनोहर पाटेकर (५१ धावा), वीरेंद्र दांडेकर (४३ धावा), सतीश स्वामी (नाबाद ६० धावा), रुपेश कोंडाळकर (३७ धावा) आदी आघाडी खेळाडूंनी दमदार फलंदाजी केली. त्यामुळे कपिल गमरे (२ बळी), संतोष साळुंखे (१ बळी) व सुनील सकपाळ (१ बळी) यांनी छान गोलंदाजी करूनही लीलावती हॉस्पिटलने मर्यादित २० षटकात ३ बाद १९७ धावा फटकाविल्या. डावखुरा फिरकी गोलंदाज विशाल शिंदेच्या पहिल्याच षटकातील चौथ्या व सहाव्या चेंडूवर ग्लोबल हॉस्पिटलचे भरवशाचे फलंदाज डॉ. संदीप आंधे व संकेत सुर्वे हे दोघेही धावांचे खाते उघडण्यापूर्वीच तंबूत परतले. त्यानंतर मात्र सलामीवीर योगेश परब (३० धावा), महेश गोविलकर (३५ धावा) व संतोष साळुंखे (४२ धावा) यांनी ग्लोबल हॉस्पिटल संघाला ४ बाद १०४ धावा अशी विजयाकडे कूच करणारी फलंदाजी करून दिली. परंतु त्यावेळी कप्तान रुपेश कोंडाळकरने ग्लोबल हॉस्पिटलचे लागोपाठ ३ फलंदाज तंबूत पाठवित स्पर्धेतील पहिली हॅट्ट्रीक नोंदविली. परिणामी प्रतिस्पर्ध्यांना १८ व्या षटकाला १२१ धावांत गुंडाळून लीलावती हॉस्पिटलने मोठा विजय मिळविला.

बुधवार, २९ मे २०१९

# लोकसत्ता

LOKSATTA.COM, FACEBOOK.COM/LOKSATTALIVE लोकमान्य, लोकशक्ती! TWITTER.COM/LOKSATTALIVE, LOKSATTA.COM/APPS

### क्रिकेट : रुपेश कोंडाळकरच्या हॅट्ट्रिकमुळे लीलावतीचा विजय

मुंबई : ऑफस्पिनर रुपेश कोंडाळकरने मिळवलेली हॅट्ट्रिक आणि मनोहर पाटेकरच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर लीलावती हॉस्पिटल संघाने ग्लोबल हॉस्पिटलचा ७६ धावांनी पराभव करत आयडियल आंतर-हॉस्पिटल टी-२० क्रिकेट स्पर्धेची दुसरी फेरी गाठली.